महाराष्ट्र शासन
गृह विभाग

शासन ज्ञापन क्र. एसआयएस-१११८/प्र.क्र.४४१/एक/पोल-७.
मंत्रालय, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.

दिनांक ३० मार्च २०१९.

विषय :- भारत सरकार, गृह मंत्रालय, यांच्या *"Special Infrastructure Scheme (SIS), including construction of 250 Fortified Police Stations in LWE affected States"* या केंद्र पुरस्कृत योजनेच्या प्रयोजनासाठी सन २०१८-१९ या वित्तीय वर्षाच्या सुधारित अंदाजांनुसार केंद्र हिस्सा (६० टक्के) अनुदान खर्च करण्यास मंजुरी देण्याबाबत.

संदर्भ :-
१) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१८/ प्र.क्र.६९/ अर्थ-३, दिनांक ०२.०४.२०१८.
२) शासन निर्णय, गृह विभाग, क्र.पीडब्ल्युएफ-०११८/प्र.क्र.५८/पोल-७, दिनांक ०५.०४.२०१८.
३) भारत सरकार, गृह मंत्रालय, एलडब्ल्युई विभाग, यांचे पत्र क्र. १८०१५/ ०२/ २०१८- एलडब्ल्युई-४, दिनांक ०६.०७.२०१८.
४) शासन निर्णय, गृह विभाग, क्र. पीडब्ल्युएफ-०११८/ प्र.क्र.५८/ पोल-७, दिनांक २३.०८.२०१८.
५) शासन शुद्धिपत्र, गृह विभाग, क्र. पीडब्ल्युएफ-०११८/ प्र.क्र.५८/ पोल-७, दिनांक ०७.०९.२०१८.
६) शासन पत्र, गृह विभाग, क्र.पीडब्ल्युएफ-०११८/प्र.क्र.५८/पोल-७, दिनांक २५.०९.२०१८.
७) शासन पत्र, गृह विभाग, क्र. एसआयएस-१११८/ प्र.क्र.४४१/ पोल-७, दिनांक ०७.१२.२०१८.
८) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१८/ प्र.क्र.६९/ अर्थ-३, दिनांक २५.०१.२०१९.
९) म.रा. पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्या. यांचे पत्र क्र. पोगृम/ लेखा-शाखा/ न.क्र.४५(१)/ ७३७/ २०१९, दिनांक ०७.०३.२०१९.
१०) पोलीस महासंचालक, म.रा., यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. पोमसं/ २१-अ/ १९५/ एसआयएस-स्कीम/ १५१/ २०१७, दिनांक १३.०३.२०१९.
११) शासन पत्र, गृह विभाग, क्र. एसआयएस-१११८/ प्र.क्र.४४१/ पोल-७, दिनांक १४.०३.२०१९.

ज्ञापन.-

भारत सरकार, गृह मंत्रालय, यांच्या *"Special Infrastructure Scheme (SIS), including construction of 250 Fortified Police Stations in LWE affected States"* या योजनेच्या प्रयोजनांसाठी, सन २०१८-१९ या वित्तीय वर्षाच्या सुधारित अंदाजांनुसार *गृह विभाग-मागणी क्रमांक बी-१०, ४०५५, पोलीसांवरील भांडवली खर्च, ००, २०७, राज्य पोलीस*

(००) (००)(०३) नक्षलग्रस्त भागामध्ये सुसज्ज पोलीस ठाणे बांधणे (६० टक्के केंद्र हिस्सा) (अनिवार्य) (४०५५०२०५) या तपशीलवार लेखाशीर्षाखाली "५३-मोठी बांधकामे" या उद्दिष्टाकरिता रु.९,००,००,०००/- *(रुपये नऊ कोटी फक्त)* इतके अनुदान मंजूर करण्यात आले आहे.

२. उक्त रक्कम अर्थसंकल्प वितरण प्रणाली द्वारे वितरित करण्यात आली आहे.

३. उक्त रक्कम अर्थात रु.९,००,००,०००/- *(रुपये नऊ कोटी फक्त)* खर्च करण्यास, याद्वारे, मंजुरी देण्यात येत आहे.

४. उक्त रक्कम कोषागारातून काढून ती संबंधितांना प्रदान करण्याच्या प्रयोजनासाठी पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, मुक्काम-नागपूर, यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, यांनी उक्त रक्कम कोषागारातून काढून ती व्यवस्थापकीय संचालक, म.रा. पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्या., यांना प्रदान करावी.

६. व्यवस्थापकीय संचालक, म.रा. पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्या., यांनी उक्त रक्कम ही *"Special Infrastructure Scheme (SIS), including construction of 250 Fortified Police Stations in LWE affected States"* या योजनेखाली मंजूर करण्यात आलेले २० पोलीस ठाणे/ उप पोलीस ठाणे यांच्या इमारतींचे बांधकाम करण्यासाठी खर्च करावी.

७. हे ज्ञापन, शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१८/ प्र.क्र.६९/ अर्थ-३, दिनांक ०२.०४.२०१८ आणि शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१८/ प्र.क्र.६९/ अर्थ-३, दिनांक २५.०१.२०१९ यांच्या अनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

८. हे ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१९०४०११२३२१९६९२९ असा आहे. हे ज्ञापन डीजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SWAPNIL GOPAL BORSE

Digitally signed by SWAPNIL GOPAL BORSE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=c6a6e7cad855fc787a96e36f11fbc87a9f66cfd9bad01184493f2735ad885627, postalCode=400032, street=2ND FLOOR,MANTRALAYA,MADAME CAMA MARG,MUMBAI, serialNumber=8538cd1e408948f7d025537d5f6589bd8958d1b95322e66d2cc5edf89ad0d79e, ou=HOME DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SWAPNIL GOPAL BORSE
Date: 2019.04.01 12:44:33 +05'30'

(स्वप्नील गोपाल बोरसे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) पोलीस महासंचालक, म.रा., मुंबई.
२) व्यवस्थापकीय संचालक, म.रा. पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्या., मुंबई.
३) अपर पोलीस महासंचालक, विशेष कृती, म.रा., मुंबई.
४) पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, मुक्काम-नागपूर.

५) पोलीस अधीक्षक, गोंदिया.

६) पोलीस अधीक्षक, गडचिरोली.

प्रत-

१) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

२) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.

३) जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर/ गोंदिया/ गडचिरोली.

४) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.

५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.

६) कार्यासन अधिकारी (व्यय-७/ अर्थ-३), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

७) निवड फाईल (पोल-७).